# श्रींच्या मुर्त्यांद्वारे पर्यावरणस्नेही समाज घडविणारी जयश्री गजाकोश




एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकतं, असं थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले म्हणायचे. म. फुल्यांच्या या वाक्याच्या धर्तीवर एक म्हणावसं वाटतं की एक महिला व्यवसाय करु लागली की संपूर्ण कुटुंब उद्योगी बनते. हे वाक्य तंतोतंत लागू होते ते जयश्री गजाकोश यांना.

मूळचे सोलापूरचे असलेल्या बाबुराव नारायण बाळशंकर आणि आशा बाबुराव बाळशंकर या दाम्पत्याच्या पोटी जयश्री गजाकोश यांचा जन्म झाला. बाबा स्वदेशी मिल मध्ये गिरणीकामगार तर आई गृहिणी. दहावी झाल्यानंतर जयश्रीचं लग्न मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या संदीप गजाकोश यांच्यासोबत झाले. सासरी संयुक्त कुटुंब होतं. मात्र जागेच्या कमतरतेमुळे जयश्री आणि संदीप या दोघांना नव्या घरी स्थलांतरीत व्हावं लागलं. दरम्यान जयश्रीने सौंदर्यप्रसाधन अभ्यासक्रम पूर्ण करून एका ब्युटी पार्लर मध्ये नोकरी केली. त्यानंतर स्वत:चंच ब्युटी पार्लर सुरु केलं.




२००८ मध्ये एका संस्थेने पर्यावरणस्नेही गणपती मुर्त्या तयार करण्याची कार्यशाळा घेतली गेली. जयश्रीने त्या कार्यशाळेत भाग घेतला. त्या मुर्त्या तयार करण्यात वाकबगार झाल्या. काही दिवसांतच गणेशोत्सव आला होता. या पहिल्याच गणेशोत्सवात त्यांनी ५० मुर्त्या तयार केल्या. याकामी त्यांचे पती संदीप गजाकोश यांनी मोलाची साथ दिली. आपल्याप्रमाणे इतर महिलांनी सुद्धा स्वत:च्या पायावर उभे रहावे. त्यांना आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी जयश्री गजाकोश यांनी त्यासाठी प्रथमेश इको फ्रेण्डली संस्था उभारली. महिलांना मुर्त्या तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली.



२००८ मध्ये ५० मुर्त्यांनिशी सुरु झालेला प्रवास २०१८ मध्ये १००० मुर्त्यांपर्यंत पोहोचलेला आहे. या मुर्त्या तयार करण्याच्या प्रक्रियेत संपूर्ण गजाकोश कुटुंब रमलेलं असतं. जयश्रींचा मुलगा अजिंक्य रात्रशाळेत शिकतो आणि दिवसा मूर्ती प्रक्रियेत रममाण होतो. मुलगी संजना विक्री प्रक्रियेमध्ये असते तर जयश्री आणि संदीप हे दाम्पत्य व्यवस्थापनात व्यस्त असतात. कुटुंब रंगलंय मुर्ती घडवण्यात असंच काहीसं या कुटुंबाकडे पाहून बोलावंसं वाटतं. गजाकोश कुटुंबाने तयार केलेल्या मुर्त्या आज सातासमुद्रापार अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, दक्षिण अफ्रिका या देशांत पोहोचल्या आहेत. प्लॅस्टर ऑफ पॅरिसची मूर्ती जिचं वजन २० किलो असते तेवढीच कागदाच्या लगद्याची मूर्ती फक्त २ किलोची असते.



टेक्सास, अमेरिका येथील डिएफ हिंदू टेम्पल मध्ये गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. २०१२ पासून येथे प्रतिष्ठापना होणारी श्रींची मूर्ती ही गजाकोश कुटुंबियांनी तयार केलेली असते. पहिल्या वर्षी ही मूर्ती ३ फूट उंचीची होती. २०१८ मध्ये ८ फूट उंचीच्या मूर्तीची निर्यात प्रथमेश इको फ्रेण्डली संस्थेने केली. हे अमेरिकन मंदीर गजाकोश कुटुंबियांना त्यांच्या या विशिष्ट सेवेसाठी सन्मानचिन्ह व सन्मानपत्र अमेरिकेहून दरवर्षी पाठविते. दै. लोकसत्ताने घेतलेल्या गणेशोत्सव स्पर्धेमध्ये संदीप गजाकोश यांना सर्वोत्कृष्ट मूर्तिकाराचा पुरस्कार मिळाला. माहीम नेचर पार्कने सुद्धा प्रथमेश इको फ्रेण्डली संस्थेची दखल घेऊन त्यांना मानपत्र दिले होते. राणी मुखर्जी, आफताब शिवदासानी सारख्या सेलेब्रिटींच्या घरी प्रथमेश इको फ्रेण्डली संस्थेचे गणपती स्थानापन्न होतात. खासदार राहुल शेवाळे यांच्या घरी माघी गणेश जयंती साजरी होते. त्यांचा गणपती देखील याच संस्थेचा असतो.







गणेश मुर्त्यांसह इतर पर्यावरणपूरक उपक्रम देखील प्रथमेश इको फ्रेण्डली संस्था राबविते. कागदी आणि कापडी पिशव्यांच्या माध्यमातून आज ही संस्था ३० हून अधिक महिलांना रोजगार देते. जयश्री गजाकोश यांच्या नेतृत्वाखाली ही संस्था महिलांसाठी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविते. यामध्ये इकोफ्रेण्डली गिफ्ट आर्टिकल्स, इकोफ्रेण्डली साबण, सुगंधी द्रव्ये आदींचा समावेश आहे. सोबतच रांगोळ्या बनविणे, चॉकलेट तयार करणे, टॅटू तयार करणे, सुलेखन कार्यशाळा, कागदी हस्तकला, नावाच्या पाट्या तयार करणे, चित्रकला आणि हस्तकला कार्यशाळा आदींचे प्रशिक्षण प्रथमेश इको फ्रेण्डली संस्थेतर्फे दिले जाते. या उपक्रमांद्वारे आतापर्यंत ५०० हून अधिक महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे.



ग्लोबल वॉर्मिंग हा सगळ्या जगाला भेडसावणारी प्रमुख समस्या. पर्यावरणस्नेही होणं हाच यावरचा उपाय आहे. जयश्री गजाकोश यांची संस्था पर्यावरणाला हातभार लावत आहे. खऱ्या अर्थाने पर्यावरणस्नेही चळवळ त्या राबवत आहेत. त्यांच्या या योगदानाबद्दल ममता प्रतिष्ठान, विमा संस्थेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. या संस्थेने तयार केलेल्या मुर्त्या वा इतर वस्तू यांची खरेदी करणे म्हणजेच या संस्थेच्या पर्यावरण चळवळीस पाठिंबा देण्यासारखे आहे. फक्त एक कुटुंबच नव्हे तर जयश्री गजाकोश अप्रत्यक्षरित्या समाज घडवत आहेत.



अधिक माहितीसाठी संपर्क-

**जयश्री गजाकोश**

**९८२१४९९०८२**

**संचालिका - प्रथमेश इको फ्रेण्डली संस्था**, मुंबई.

***